THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 16TH JANUARY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं दिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १० माहे आक्टोबर सन १८९५ रोजीं मंजूर केला; तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—**

### सन १८९५ चा आक्ट १६ वा.

**कित्येक निरुपयोगी कायदे रद्द करण्याबाबदचा व दुसरे कित्येक कायदे सुधारण्याबाबदचा आक्ट.**

ह्या आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांत सांगितलेल्या ज्या कित्येक कायद्यांचें कारण राहिलेलें नाहीं अथवा जे स्पष्ट रीतीनें किंवा विशेष रीतीनें रद्द केल्याशिवाय ज्यांचा अमल कोणत्यातरी कारणानें बंद झालेला आहे किंवा कालांतरानें किंवा इतर कांहीं कारणानें ज्यांची जरूरी राहिली नाहीं ते मुद्दाम स्पष्टपणें व विशेष रीतीनें रद्द करणें ज्याअर्थीं योग्य आहे;

आणि ज्याअर्थीं या आक्टाच्या दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेल्या कायद्यांत कांहीं भाषावगैरेसंबंधीं सुधारणा करणेंही योग्य आहे;

त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे:—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९९ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट असें ह्मणावें;

(२) तो मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या अमलखालील सगळ्या प्रदेशास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

पहिल्या व दुसऱ्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेले कायदे अनुक्रमें रद्द केले व सुधारले आहेत.

२. (१) पहिल्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेले कायदे त्याच्या चवथ्या आसनांत सांगितले आहेत तेथवर यावरून रद्द केले आहेत.

(२) दुसऱ्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या कायद्यांत, त्याच परिशिष्टाच्या चवथ्या आसनांत सांगितलें आहे तेथवर व त्या रीतीनें फेरफार केले आहेत.

बचाव. ३. कोणताहीं कायदा या आक्टावरून रद्द केल्यामुळें, तो कायदा ज्या स्टाटूटांत, आक्टांत किंवा कायद्यांत लागू केला असेल किंवा सामील केला असेल, किंवा त्याचा ज्या स्टाटूटांत, आक्टांत किंवा कायद्यांत उल्लेख केलेला असेल, त्या स्टाटूटास, आक्टास किंवा कायद्यास बाध येतो असें समजूं नये;

आणि जी कोणतीही गोष्ट केली असेल अगर करूं दिली असेल तिचा, किंवा मिळविलेल्या, उत्पन्न झालेल्या अगर आलेल्या कोणत्याही हक्काचा, दाव्याचा, अवश्यकतेचा अगर पात्रतेचा किंवा यांच्या संबंधानें केलेल्या कोणत्याही उपायाचा अगर चालविलेल्या कोणत्याही कामाचा, किंवा कोणत्याही कर्जापासून, गुन्हेगारीपासून अवश्यकतेपासून, पात्रतेपासून, दाव्यापासून अगर मागणीपासून मिळालेल्या सुटकेचा अगर मोकळिकीचा किंवा दिलेल्या मोबदल्याचा किंवा मागील कोणत्याही कृत्याचे अगर गोष्टीचे पुराव्याचा जो कायदेशीरपणा, बेकायदेशीरपणा, परिणाम अगर फल यांस या आक्टावरून बाध येतो असें समजूं नये;

तसेंच, कायद्याचें कोणतेंही मूलतत्त्व अगर नियम, किंवा ठरलेली हुकुमत अगर पद्धत, किंवा जाबजबाब देण्याच्या, वहिवाटीच्या अगर काम चालविण्याच्या रीतीची ठरलेली पद्धत, किंवा चालू रिवाज, चालू अधिकार, प्रतिबंध, माफी, हुद्दा अगर नेमणूक, हीं, याअन्वयें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्यावरून, कायद्यांत अगर कायद्याअन्वयें कोणत्याही रीतीनें अनुक्रमें कायम झालीं असलीं, कबूल केलीं असलीं अगर प्राप्त झालीं असलीं तरी, त्यांना या आक्टावरून बाध येणार नाहीं असें समजावें;

तसेंच, हल्लीं नसणारी किंवा अमलांत नसणारी कोणतीहि हुकुमत, हुद्दा, चाल, पात्रता, हक्क, अधिकार, निर्बंध, माफी, रिवाज, वहिवाट, काम चालविण्याची रीत अगर इतर गोष्ट अगर वस्तु, या आक्टाअन्वयें कोणताही कायदा रद्द झाल्यानें ठरते अगर पुनः चालू होते असें समजूं नये.

---

## पहिलें परिशिष्ट.

### रद्द केलेले कायदे.

कोणत्याही आक्टाच्या अगर कायद्याच्या भागाचें वर्णन देतांना किंवा उतारा देतांना त्या वर्णनांत किंवा उताऱ्यांत त्या भागाच्या आरंभींचे अगर शेवटचे ह्मणून जे शब्द, कलम अगर इतर अंश सांगितले असतील अगर उल्लेख केलेले असतील, त्यांचा त्या भागांत समावेश होतो असें समजावें.

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | किती रद्द केला तें. |
| | | **भाग १.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | |
| १८६० | ४८ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| १८७६ | १० | सन १८७६ चा मुंबईचा रेव्हेन्यू हुकुमतीचा आक्ट. | कलम १, रकम (क). |
| ,, | २० | सन १८७६ चा भावनगरचा आक्ट. | कलम ३. |

पहिलें परिशिष्ट—( पुढें चालू ).

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | किती रद्द केला तें. |
| **भाग १.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.—( समाप्त.)** | | | |
| १८७९ | १७ | सन १८७९ चा दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचा आक्ट. | कलम ३, रकम (अ), यांतला "सन १८७९ च्या नवेंबर महिन्याच्या पहिल्या तारिखेस अगर त्यानंतर" हा मजकुर.<br>सदरहू कलमाच्या (ब) रकमेंतला "त्याच तारिखेस अगर त्या तारिखेनंतर आणलेले" हा मजकुर.<br>कलम ९ ह्यांतला, "आणि सबार्डिनेट जज्जास यापूर्वी दिलेली" ह्या मजकुरापासून तों कलमाच्या अखेरपर्यंतचा मजकुर. |
| १८८१ | २३ | सन १८८१ चा दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचा आक्ट. | कलमें ६ व ८. |
| १८८२ | २२ | सन १८८२ चा दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचा आक्ट. | कलमें ३, ७, ११ व १२.<br>कलम १४ ह्यांतले "व बावन्नाव्या" हे शब्द. |
| १८८६ | २३ | सन १८८६ चा दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचा आक्ट. | कलम ४. |
| १८८९ | १४ | कित्येक साक्षीदारांचा बचाव करण्याबाबद आक्ट. | सगळा. |
| **भाग २.—मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | | | |
| १८६३ | २ | जमिनीच्या धाऱ्याच्या माफीविषयीं आक्ट. | कलम ११, रकम १ ली, हींतले "या आक्टाचे ६ वे कलमाप्रमाणें" ह्या मजकुरांतले "या आक्टाचे" हे शब्द.<br>कलम १२. |
| " | ३ | सातारा प्रांतास मुंबई इलाक्याचे कायदे लागू करणें इत्यादि. | सरनाम्यांतला "व सरकारांत आलेलीं कित्येक संस्थानें" येथपासून 'उत्तर कानडा जिल्हा" येथपर्यंतचा मजकुर.<br>उद्देशांतला "आणि गायकवाड सरकारांनीं" येथपासून "त्या जिल्ह्यास मुंबई इलाक्याचे कायदे व आक्ट लागू करणें योग्य आहे" येथपर्यंतचा मजकुर.<br>कलम ४, रकम दुसरी. |
| १८६५ | ३ | पैंजांबाबद. | कलम ४. |
| १८६६ | १<br>[मराठी तरजुमा झालेला नाहीं]. | | |
| " | ८ | विषें विकण्याबाबद आक्ट. | [मराठी तरजुमा बरोबर आहे]. |
| " | १२<br>[मराठी तरजुमा झालेला नाहीं]. | | |

पहिलें परिशिष्ट—( पुढें चालू ).

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | किती रद्द केला तें. |
| | | **भाग २.—मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.—( पुढें चालू ).** | |
| १८६६ | १४ | एदलाबाद व वरणगांव यांबाबद आक्ट. | कलम ३ ह्यांतला "मुंबई प्रेसिडेन्सीचे ताब्यांतील देशांत" येथपासून "६ वे कलमावरून सुधारला" येथपर्यंतचा मजकुर. |
| १८७१ | २ | शेतकरी नसणारे कित्येक लोकांवर कर बसविण्याविषयीं आक्ट. | रद्द केलेला नाहीं तितका. |
| १८७२ | २ [मराठी तरजुमा झालेला नाहीं]. | | |
| १८७३ | ६ | मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट. | आठव्या भागांतील शिरोलेखापैकीं "आणि अपिलें" हे शब्द.<br>कलम २१, रकम (४). |
| १८७४ | ३ | वंशपरंपरेचे हुद्यांविषयींचा मुंबईचा आक्ट. | कलम ७७ ह्यांतला "रेवेन्यू" हा शब्द.<br>कलम १४, रकम (२).<br>कलम १९, रकम (२). |
| १८७५ | ३ | रस्त्यांवरील व पुलांवरील टोलांबाबद. | कलम २.<br>कलम ३ ह्यांतला, "टोलांचे सदरहू प्रकारचे दर" येथपासून "असें समजावें" येथपर्यंतचा मजकुर. |
| १८७६ | ३ | सन १८७६ चा मामलतदारांचे कोर्टांचा आक्ट. | कलम ३, रकम (१), हींतला "किंवा सन १८६४ चे मुंबईचे" येथपासून "दिलेली असेल" येथपर्यंतचा मजकुर. |
| १८७७ | १ | सन १८७७ चा मुंबईचा व्याक्सिनेशन आक्ट. | कलम ७ ह्यांतला दुसऱ्या पारिग्राफाच्या शेवटचा "आणि" शब्द व तिसरा सगळा पारिग्राफ. |
| १८७८ | ५ | सन १८७८ चा मुंबईचा आबकारी आक्ट. | कलम २ व परिशिष्ट.<br>कलम ३, रकम (९), हींतला "हिंदुस्थानचे" हा शब्द.<br>कलमें ६४, ६५ व ६६. |
| १८७९ | ४ [मराठी तरजुमा झालेला नाहीं]. | | |
| " | ५ | सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा. | कलम १ ह्यांतलीं शेवटचीं दोन वाक्यें.<br>कलम ४ ह्यांतला ४ था पारिग्राफ आणि कलम ७ ह्यांतला ३ रा पारिग्राफ.<br>कलम ८ ह्यांतले "त्या जिल्ह्याचा" हे शब्द, कलम ११ ह्याच्या पहिल्या पारिग्राफांतल्या शेवटच्या ओळींतला "जिल्ह्याचा" हा शब्द |

पहिलें परिशिष्ट—(पुढें चालू).

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | किती रद्द केला तें. |
| | | **मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.—(पुढें चालू).** | |
| | | | आणि कलम १०, पारिग्राफ २, ह्यांतला "जिल्ह्याचा" हा शब्द.<br>कलम १२ ह्यातलें शेवटचें वाक्य.<br>कलम १४ ह्यांतलें शेवटचें वाक्य.<br>कलम १७ ह्यांतला "आणि ह्या कलमाअन्वयें" येथपासून "त्यानें ठेवीत जावीं" येथपर्यंतचा मजकुर.<br>कलम २२ ह्यांतलें शेवटचें वाक्य.<br>कलम १३२ ह्यातलें शेवटचें वाक्य.<br>परिशिष्ट अ, तें सन १८६६ चा मुंबईचा आक्ट १ ला ह्यासंबंधाचें आहे तितक्यापुरतें. |
| १८७९ | ७ | सन १८७९ चा मुंबईचा इरिगेशन आक्ट | कलम ३३. |
| १८८० | ३ | सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ७ वा ह्यांतलीं विवक्षित कलमें रद्द करण्याबाबद. | सगळा. |
| १८८२ | १ | सन १८७८ चा मुंबईचा आक्ट ७ वा रद्द करण्याबाबद. | सगळा. |
| ,, | ७ [मराठी तरजुमा झालेला नाहीं]. | | |
| १८८३ | ५ [मराठी तरजुमा झालेला नाहीं]. | | |
| १८८४ | १ | सन १८८४ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट. | कलम ४४, रकम (२), हींतला "किंवा गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं ४२ व्या कलमाअन्वयें केलेल्या हुकमावरून" हा मजकुर. |
| ,, | २ | सन १८८४ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट सुधारण्याकरितां आक्ट. | कलम ३ ह्याचा दुसरा विशेष ठराव. |
| १८८५ | १ [मराठी तरजुमा झालेला नाहीं]. | | |
| ,, | ४ | सन १८८४ चा मुंबईचा आक्ट १ (लोकल बोर्डांबाबद) व आक्ट २ (डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिट्यांबाबद) सुधारण्याबाबद. | कलमें २ व ४. |
| १८८६ | ३ | सन १८८६ चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट. | कलम २, पारिग्राफ पहिला.<br>कलम ३, रकम (५), हींतला "प्रिन्स आफ् वेल्स आयलंड, सिंगापुर व मलाका हीं संस्थानें खेरीज करून" हा मजकुर व त्यानंतरचा "दुसरे" हा शब्द.<br>परिशिष्ट अ रद्द केलेलें नाहीं तितकें. |

पहिलें परिशिष्ट—(पुढें चालू).

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | किती रद्द केला तें. |
| **भाग २.—मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.—(पुढें चालू).** | | | |
| | | | परिशिष्ट ब ह्याचा जेवढा भाग, खालील मुंबईच्या आक्टांसंबंधीं आहे तेवढाः– सन १८६२ चा १ ला, सन १८६२ चा ५ वा, सन १८६२ चा ६ वा, सन १८६३ चा १ ला, सन १८६३ चा ३ रा, सन १८६३ चा ५ वा, सन १८६३ चा ६ वा, सन १८६६ चा ७ वा, सन १८६६ चा ८ वा, सन १८६६ चा १२ वा, सन १८६६ चा १३ वा, सन १८६७ चा ६, वा सन १८६८ चा २ रा, सन १८६९ चा ३ रा, सन १८७१ चा २ रा, सन १८७२ चा १ ला, सन १८७३ चा ६ वा, सन १८७४ चा १ ला, सन १८७४ चा २ रा, सन १८७४ चा ३ रा, सन १८७५ चा ३ रा, सन १८७६ चा २ रा, सन १८७६ चा ३ रा, सन १८७७ चा १ ला, सन १८७९ चा ४ था, सन १८७९ चा ५ वा, सन १८७९ चा ६ वा, सन १८७९ चा ७ वा, सन १८८० चा १ ला, सन १८८३ चा १ ला, सन १८८३ चा २ रा, सन १८८४ चा १ ला, व सन १८८४ चा २ रा. |
| १८८६ | ५ | वंशपरंपरेच्या हुद्यांबाबद (सन १८७४ चा मुंबईचा आक्ट ३ रा सुधारण्याबाबद). | कलम ४. |
| १८८७ | ४ | सन १८८७ चा मुंबईचा जुगार खेळण्याची मनाई करण्याविषयींचा आक्ट. | कलम २ आणि परिशिष्ट. |
| १८८८ | १ | सन १८८४ मुंबईचा आक्ट १ (लोकल बोर्डाबाबद) आणि आक्ट २ (डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिट्यांबाबद) ह्यांची सुधारणा. | कलम २. |
| ,, | ३ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| ,, | ४ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| ,, | ५ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| ,, | ६ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |

पहिलें परिशिष्ट.—( समाप्त. )

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | किती रद्द केला तें. |
| **भाग २.—मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.—( समाप्त. )** | | | |
| १८९० | २ | सन १८९० चा मुंबईचा मिठाचा आक्ट | कलम १, पोट कलम (२), ह्यांतला, "परंतु तो" येथपासून "अमलांत येणार नाहीं" येथपर्यंत-चा मजकुर. |
| | | | कलम ९. |
| ,, | ४ | सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट. | कलम २, पारिग्राफ पहिला, शेवटचे पंधरा शब्द |
| | | | कलम ८९. |
| १८९१ | १ | सन १८८६ चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट. | कलम १. |
| ,, | २ | सन १८९१ चा मुंबईचा बायलर तपासण्यांविषयींचा आक्ट. | कलम २८, रकम (क), ह्यांतला "इन्स्पेक्टरास" हा शब्द. |
| १८९२ | १ | सन १८९२ चा मुंबईचा जिल्ह्यांनिहाय गोस्तन देवी काढविण्याबाबद आक्ट. | कलम ३३, पोट कलम (२). |
| **भाग ३.— बांबे कोडमधले रेग्युलेशन.** | | | |
| १८२७ | २ | वकिलांबाबद. | कलम ९०, रकम ३, ह्यांतला, "या कायद्याचे छपन्नावे कलमांत लिहिल्याप्रमाणें" हा मजकुर. |
| | | | कलम ९१, रकम २, ह्यांतला, "या कायद्याचे छपन्नावे कलमांत लिहिल्याप्रमाणें" हा मजकुर. |
| | | | कलम ९६ ह्यांतला या "कायद्याचे चौतिसावे कलमाचे तिसरे व चौथे रकमेंत लिहिल्याप्रमाणें" हा मजकुर. |
| १८३४ | १ | दक्षिणेंतील सरदारांचा डेप्युटी एजंट ह्याचा हुद्दा काढून टाकण्याबाबद. | रद्द केलेला नाहीं तितका. |

भाग ४.— ३३ व्हिक्टोरिया, चाप्टर ३ ह्याखालचे रेग्युलेशन.

[ मराठी तरजुमा झालेला नाहीं. ]

---

## दुसरें परिशिष्ट.

### सुधारलेले कायदे.

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | सुधारणा. |
| | | **भाग १.— मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | |
| १८६३ | २<br>[मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | जमिनींच्या धान्यांच्या माफीविषयीं आक्ट. | [मराठी तरजुमा बरोबर आहे.] |
| ,, | ६ | (मुंबई शहर, टापू व बंदर यांतल्या) सार्वजनिक वाहनांबाबद. | कलम १८ ह्यांत "कायद्यांचा" ह्या शब्दाच्या ऐवजीं 'कायद्याचा" हा शब्द दाखल करावा. |
| ,, | ७ | जमिनीच्या धान्याच्या माफीविषयीं आक्ट. | कलम १८, रकम दुसरी, आणि कलम १९, रकम पांचवी, ह्यांत, "स्टांप आक्टांतील" ह्या शब्दांच्या बदला, "सन १८७० चा कोर्टांचे फीचा आक्ट ह्यांतील" हा मजकुर दाखल करावा. |
| १८६७ | ६ | मुंबई शहर निरोगी राखण्याबाबद बंदोबस्त करण्याविषयीं आक्ट. | कलम ४ ह्यांत, "जोडलेले परिशिष्टांतील" ह्या शब्दांच्या ऐवजीं "जोडलेलें परिशिष्ट अ यांतील" हा मजकुर दाखल करावा.<br>कलम ८ ह्यांत, "खालीं लिहिल्याप्रमाणें" व "हुकुम करण्याचा" ह्यांच्या दरम्यान, "परिशिष्ट ब ह्यांत दिलेल्या नमुन्याबरहुकुम लेखी" हा मजकुर दाखल करावा. |
| १८६९ | ३ | सन १८६९ चा मुंबईचा लोकल फंडाविषयीं आक्ट. | [मराठी तरजुमा बरोबर आहे.] |
| १८७३ | ६ | मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट. | कलम ९३, रकम १, हींत "खाणीवर" ह्या शब्दाच्या ऐवजीं "कीवर" हा शब्द दाखल करावा. |
| १८७४ | ३ | वंशपरंपरेचे हुद्यांविषयीं मुंबईचा आक्ट. | [मराठी तरजुमा बरोबर आहे.] |
| १८७६ | २<br>[मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| १८७७ | १ | सन १८७७ चा मुंबईचा व्याक्सिनेशन आक्ट. | कलम २८ ह्यांतल्या "कलकत्ता व मद्रास व मुंबई या शहरांचे" येथपासून कलमाच्या शेवटपर्यंतच्या मजकुराऐवजीं "फौजदारी कोर्टांनीं केलेले दंड वसूल करण्यासाठीं त्या त्या वेळीं |

दुसरें परिशिष्ट.—(पुढें चालू.)

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | सुधारणा. |
| **भाग १.—मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.—(पुढें चालू.)** | | | |
| | | | अमलांत असलेल्या कायद्यांत सांगितलेल्या रीतीनें वसूल करण्याचा अधिकार आहे" हा मजकुर दाखल करावा. |
| | | | परिशिष्ट ड यांत "दाहा रुपये" या शब्दांच्या ऐवजीं "पन्नास रुपये" हे शब्द दाखल करावे. |
| १८७९ | ४ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| " | ६ | सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा. | कलम ६१ ह्यांत, "अपुरे भागापर्यंत" ह्या शब्दांच्या बदला, "कोणत्याही भागापर्यंत" हे शब्द दाखल करावे. [कलम ९९, रकम (ब) ह्याच्या संबंधानें येथें (इंग्रजींत) दाखल केलेली सुधारणा मराठी तरजुम्यांत करण्याची जरूरी नाहीं.] कलम १०४ ह्याच्या दुसऱ्या पारिग्राफाच्या सुरवातीस "अवल अगर" हे शब्द दाखल करावे. कलम २११ ह्यांतल्या "व असिस्टंट सर्वे सुपरिंटेंडंट" ह्या शब्दांपैकीं "व" हा शब्द गाळावा. |
| १८८२ | ४ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| " | ७ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| १८८३ | १ | सन १८८३ चा मुंबईचा हम रस्त्यांविषयीं आक्ट. | कलम ९ ह्यांत, "म्युनिसिपालिटींच्या" ह्या शब्दाच्या बदला "म्युनिसिपालिटीच्या" हा शब्द दाखल करावा. |
| १८८४ | २ | सन १८८४ चा, डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट सुधारण्याकरितां आक्ट. | [मराठी तरजुमा बरोबर आहे.] |
| १८८६ | ३ | सन १८८६ चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट. | [मराठी तरजुमा बरोबर आहे.] |
| १८८८ | ३ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |

## दुसरें परिशिष्ट.—(समाप्त.)

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्ष. | नंबर. | विषय अगर सरनामा. | सुधारणा. |
| **भाग १.—मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.—(समाप्त.)** | | | |
| १८८८ | ५ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |
| **भाग २.—मुंबई कोडाचे रेग्युलेशन.** | | | |
| १८२७ | २ | वकिलांबाबद. | [मराठी तरजुमा बरोबर आहे.] |
| १८३० | ७ [मराठी तरजुमा झालेला नाहीं.] | | |

जे. एम्. म्याक्फर्सन,
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसवत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.